07 AUG 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कवितेतून घडणाऱ्या-बिघडणाऱ्या वर्तमानाचे दर्शन

## ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात वसंत डहाके, दिशा पिंकी शेख यांना काळसेकर पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

घडणाऱ्या–बिघडणाऱ्या वर्तमानाचे दर्शन कवितांतून घडते. वसंत डहाके आणि दिशा पिंकी शेख यांच्या कवितांतून वास्तव वाचकांसमोर मांडले आहे. पण साहित्य आणि समाज लिंगभेदाच्या राजकारणातून मुक्त होण्याची गरज आहे, लिंगभेदातून साहित्य मुक्त असावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी केले.



कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके आणि कवयित्री दिशा पिंकी शेख यांना काळसेकर पुरस्कार प्रदान करण्यात आले. समवेत (डावीकडून) डॉ. रणधीर शिंदे, प्रा. अविनाश सप्रे, सुप्रिया काळसेकर, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. विलास शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.

शिवाजी विद्यापीठात 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' आणि 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. यावेळी प्रा. सप्रे यांच्या हस्ते ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर दिशा पिंकी शेख यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आले.

प्रा. सप्रे म्हणाले, 'मी कवी आहे, म्हणून मी आहे,' असे म्हणणारा कवी माणूस म्हणजे डहाके. साठोत्तरी कालखंडातली मराठीतील श्रेष्ठ दर्जाची कविता त्यांची आहे. घडणाऱ्या–बिघडणाऱ्या वर्तमानाचे दर्शन घडवणारीही ही कविता आहे. दिशा पिंकी शेख यांची कविता व्यथा, वेदना, कलह, संघर्षाची आहे, पण त्याहूनही ती माणुसकीची कविता आहे. 'खांदा टेकण्याचे ठिकाण म्हणजे शब्द' अशी भावना असणाऱ्या शेख यांच्या कवितांत समग्र प्रस्थापित स्वरुपाचे विध्वंसन आहे.

साहित्यिक वसंत डहाके म्हणाले, काळसेकर यांच्या नावे पुरस्काराचा क्षण एकाच वेळी आनंददायी आणि वेदनादायी आहे. काळसेकर यांनी थोडकीच पण चिरस्मरणीय कविता लिहिली. कवितेची दखल घ्यावयास लावणारी समीक्षाही त्यांनी लिहिली.

दिशा पिंकी शेख म्हणाल्या, विद्यापीठाकडून मिळालेला हा पहिलाच अधिकृत पुरस्कार आहे. कोल्हापूरशी माझे जुने नाते आहे. लढण्याचे बळ देणारी ही भूमी आहे. आम्ही लिहिण्याचा प्रयत्न करतो आहोत. आमच्या लेखण्यांना सामर्थ्य देण्याचे काम विद्यापीठांनी करावे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, केवळ आनंदीआनंद म्हणजे साहित्य नव्हे, तर दुःख, वेदना आणि आक्रंदन म्हणजेही साहित्यच असते, हे या साहित्यिकांनी समाजासमोर आणलेले ठळक वास्तव आहे. ते विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे.

मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी भूमिका स्पष्ट केली. मानसी काळसेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. आर.जी. कुलकर्णी, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्रभा गणोरकर, डॉ. उदय नारकर, डॉ. माया पंडित, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. अरुण शिंदे, डॉ. रघुनाथ कडाकणे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
07 AUG 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनासाठी कार्यशाळा मार्गदर्शक

## डॉ. संजीवकुमार श्रीवास्तव यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा उत्साहात

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

संशोधन आणि विकास संसाधने सामायिक करण्याबाबत जागरूकता कार्यशाळा संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे, असे प्रतिपादन भारत सरकार संचलित तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी सुविधा केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजीवकुमार श्रीवास्तव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात भारत सरकार तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी सुविधा केंद्र, शिवाजी विद्यापीठातील सैफ–डीएसटी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'I-STEM पोर्टलद्वारे संशोधन आणि विकास संसाधने सामायिक करण्याबाबत जागरूकता कार्यशाळा' आयोजित केली होती. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यशाळेला प्रारंभ झाला.



**कोल्हापूर : कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. संजीव कुमार श्रीवास्तव, सैफ–डीएसटी केंद्राचे डॉ. आर. जी. सोनकवडे आदी.**

डॉ. श्रीवास्तव म्हणाले, शिवाजी विद्यापीठ केवळ २० मिनिटांत I-STEM पोर्टलवर नोंदणी करू शकले. विद्यापीठ, महाविद्यालयांनी या पोर्टलवर नोंदणी केल्यास तुमच्या संशोधनाची माहिती केंद्र सरकारला मिळेल. यातील उत्कृष्ट संशोधनाला एक लाखापर्यंतची आर्थिक मदतही केली जाते. करदात्यांचे पैसे आमच्याकडे अनुदानाच्या स्वरूपात येतात. त्यामुळे पारदर्शकपणे विद्यार्थ्यांची सेवा करणे आपले कर्तव्य आहे. सरकारच्या अर्थसहाय्यित संशोधन आणि विकासाची संसाधने यांचा कार्यक्षम वापर कसा करावा. फॉरवर्ड केलेल्या इतर संदेशांऐवजी समस्या आणि उपायांवर चर्चा करा. सुविधांची माहिती एकत्र करून सुविधांचा संशोधन कार्यासाठी वापर केल्यास दोघातील अंतर भरून काढणे मुख्य उद्दिष्ट आहे. हा २००८ पासून हा कार्यक्रम यशस्वी होत असून, सुमारे ७ हजार लोकांना याचा लाभ झाला आहे. या सुविधांमुळे संशोधक विद्यार्थ्यांचा खर्च, कष्ट कमी होते.

आयएससी बेंगलोरच्या सेंटरफॉर नॅनोसायन्स अँड इंजिनीअरिंग डीन, इंटर डिसिप्लिनरी सायन्सेसचे प्रा. नवकांता भट म्हणाले, भारत सरकार संशोधकांना आणि भरत आत्मानिर्भर बनवण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यामुळे ही कार्यशाळा नवोदित संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरेल. देशातील विविध साधनांसह १७०० विविध संस्थांचे नेटवर्क सक्षम केले आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, भारतात पूर्वीपासून विज्ञान आणि तंत्रज्ञान वापरासाठी आय–एसटीईएमे हा प्रभावी मार्ग आहे. त्याचबरोबर ऑटो कॅड, आयआयएससीसारखी सॉफ्टवेअरचे परवाने आहेत. याचा वापर संशोधकांसाठी विनामूल्य करण्याची संधी मिळत आहे. केआयटी संशोधन आणि विकास आयडिया लॅबचे अधिष्ठाता प्रा. शिवलिंग पिसे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. डी. एस. भांगे, सैफ–डीएसटीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी 'अत्याधुनिक साधनांचा वापर करूनमॉर्फोलॉजिकल आणि स्ट्रक्चरल कॅरेक्टरायझेशन' या विषयावर मार्गदर्शन केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 7 AUG 2022 सकाळ

# करदात्यांचे पैसे पारदर्शक ठेवणे कर्तव्य

## डॉ. संजीवकुमार श्रीवास्तव; शिवाजी विद्यापीठात जागरुकता कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ६ : करदात्यांचे अनुदानाच्या स्वरूपात आलेले पैसे लोकशाही पद्धतीने पारदर्शक ठेवणे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन आय-एसटीइएमचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजीव कुमार श्रीवास्तव यांनी येथे केले. आय-एसटीइएम पोर्टलद्वारे संशोधन आणि विकास संसाधने सामायिक करण्याबाबत जागरुकता कार्यशाळेत ते बोलत होते. सेफ-डीएसटी विभागाने, भारतीय विज्ञान, प्रधान वैज्ञानिक सल्लागार, भारत सरकारच्या कार्यालयाद्वारे संचालित तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी सुविधा नकाशाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम झाला.

डॉ. श्रीवास्तव यांनी सुविधांची माहिती एकत्र करून आणि नंतर



या सुविधांचा संशोधन कार्यासाठी वापर करून सुविधा आणि संशोधक यामधील अंतर भरून काढणे आय-एसटीइएमचे उद्दिष्ट आहे, असे सांगितले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी भारतात पूर्वीपासून असलेले विज्ञान आणि तंत्रज्ञान वापरण्याचा आय-एसटीइएम हा एक प्रभावी मार्ग आहे, असे सांगितले.

सेफ-डीएसटी केंद्राचे प्रभारी प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी अत्याधुनिक साधनांचा वापर करून मॉर्फोलॉजिकल आणि स्ट्रक्चरल कॅरेक्टरायझेशनची माहिती दिली. तसेच विद्यापीठ केवळ वीस मिनिटांत आय-एसटीइएम पोर्टलवर नोंदणी करू शकले, असे स्पष्ट केले.

आयआयएससी बंगळूरच्या इंटर डिसिप्लिनरी सायन्सेसचे प्रा. नवकांता भट यांनीही ऑनलाईन संवाद साधला. प्रा. शिवलिंग पिसे यांनी आयडिया लॅब कशा पद्धतीने काम करते, या विषयावर माहिती दिली. प्रा. डॉ. डी. एस. भांगे उपस्थित होते. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. वरिष्ठ प्रकल्प डॉ. मकसुद वाईकर यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : आय-एसटीइएम पोर्टलद्वारे संशोधन आणि विकास संसाधने सामायिक करण्याबाबत आयोजित जागरुकता कार्यशाळेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, आय-एसटीइएमचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. संजीव कुमार श्रीवास्तव, सेफ-डीएसटी केंद्राचे प्रभारी प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे.**

0 7 AUG 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुविधा अन् संशोधकांतील अंतर कमी करू

## संजयकुमार श्रीवास्तव यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात जनजागरूकता कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सुविधांचा संशोधन कार्यासाठी वापर करून सुविधा आणि संशोधक यांच्यातील अंतर भरून काढणे हे आय-स्टेमचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन आय-स्टेमचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजयकुमार श्रीवास्तव यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ-सेफ-डीएसटी,(आय-स्टेम) यांच्यावतीने आयोजित जनजागरुकता कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, आय-स्टेमचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजीवकुमार श्रीवास्तव, सेफ-डीएसटी केंद्राचे प्रभारी प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ-सेफ-डीएसटी, भारतीय विज्ञान, प्रधान वैज्ञानिक सल्लागार, भारत सरकारच्या कार्यालयाद्वारे संचलित तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी सुविधा नकाशा (आय-स्टेम) यांच्या वतीने आयोजित जनजागरूकता कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. श्रीवास्तव म्हणाले, फॉरवर्ड केलेल्या संदेशाऐवजी समस्या व उपायांवर चर्चा करा. करदात्यांचे पैसे आमच्याकडे अनुदानाच्या स्वरूपात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची सेवा करणे आणि ते पैसे लोकशाही पद्धतीने पारदर्शक ठेवणे हे आपले कर्तव्य आहे.

सुरुवातीस सेफ-डीएसटी केंद्राचे प्रभारी प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे म्हणाले, शिवाजी विद्यापीठ केवळ २० मिनिटांत आय-स्टेम पोर्टलद्वारे नोंदणी करू शकले. आयआयएससी बंगळुरूच्या सेंटर फॉर नॅनोसायन्स ॲन्ड इंजिनिअरिंगचे अधिष्ठाता नवकांता भट यांचेही मार्गदर्शन झाले.

दुसऱ्या सत्रात के.आय.टी.चे प्रा. शिवलिंग पिसे व शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे डॉ. डी. एस. भांगे हे सहभागी झाले. एसटीयूटीआयचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
07 AUG 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'खेड्याकडे चला'ची पुन्हा गरज : दळवी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ग्रामविकासासाठी महात्मा गांधी यांनी 'खेड्याकडे चला' असे सांगितले होते. सध्याच्या काळात या मंत्राची पुन्हा गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन निवृत्त प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत दळवी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित स्वातंत्र्याची पंचाहत्तरी अंतर्गत 'ग्रामीण विकासाची पंचाहत्तरी' या दोनदिवसीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.



**चंद्रकांत दळवी**

दळवी म्हणाले, ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची उभारणी, रस्ते, वाहतूक, संवादाची साधने, शिक्षण, आरोग्य सुविधांची तातडीची गरज आहे. या सुविधा उभारल्याखेरीज ग्रामविकास दृष्टिपथात येणार नाही. गावे राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांना जोडणे आवश्यक आहे. तसेच अंतर्गत रस्ते वं शेतीसाठी पाणंद रस्ते निर्माण करणे ग्रामविकासासाठी आवश्यक आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ग्रामीण विकास निर्देशांकावर काम करणे आवश्यक आहे. जिल्हा ग्रामीण विकास निधीप्रमाणे ग्रामविकास निधीबाबत ग्रामस्तरावरून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

यावेळी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश पवार, संयोजिका डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, डॉ. नितीन माळी, प्रा. गजानन साळुंखे, प्रा. चेतन गळगे, डॉ. उमेश गडेकर, प्रा. अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, प्रा. सुधीर देसाई, डॉ. नीलम जाधव, डॉ. दादा ननवरे, डॉ. विशाल ओव्हाळ, डॉ. ऊर्मिला दशवंत, प्रा. परशुराम वडर, डॉ. सागर वाळवेकर, प्रा. मृणालिनी जगताप आदी उपस्थित होते.

0 7 AUG 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘खेड्याकडे चला’ मंत्राची पुन्हा गरज

## चंद्रकांत दळवी; शिवाजी विद्यापीठात ‘स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी’वर परिसंवाद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : ग्रामविकासासाठी महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या ‘खेड्याकडे चला’ या मंत्राची पुन्हा गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन निवृत्त अधिकारी चंद्रकांत दळवी यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट आयोजित स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी अंतर्गत ‘ग्रामीण विकासाची पंच्याहत्तरी’ परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

श्री. दळवी म्हणाले, ‘ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची उभारणी, रस्ते, वाहतूक, संवादाची साधने, शिक्षण, आरोग्य सुविधांची तातडीची गरज असून, या सुविधा उभारल्याखेरीज ग्रामविकास दृष्टिपथात येणार नाही. रस्त्यांत मुख्यतः गाव राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांना जोडणे आवश्यक आहे. तसेच, अंतर्गत रस्ते व शेतीसाठी पाणंद रस्ते निर्माण करणे आवश्यक आहे.’

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ‘ग्रामीण विकास निर्देशांकावर काम करणे आवश्यक आहे. जिल्हा ग्रामीण विकास निधीप्रमाणे ग्रामविकास निधीबाबत ग्रामस्तरावरून प्रयत्न होणे गरजेचे आहे.’ परिसंवादासाठी कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश येथून संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले असून, ग्रामीण विकासासंदर्भातील सुमारे ५० शोधनिबंध सादर करण्यात येणार आहेत.

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. प्रकाश पवार, प्रा डॉ. कविता वड्राळे, प्रा. डॉ. संतोष सुतार, प्रा. डॉ. नितीन माळी, प्रा. गजानन साळुंखे, प्रा. चेतन गळगे, प्रा. डॉ. उमेश गडेकर, प्रा. अमोल मिणचेकर, प्रा. डॉ. वैशाली भोसले, प्रा. सुधीर देसाई, प्रा. डॉ. नीलम जाधव सहा. प्रा. डॉ. दादा ननवरे, प्रा. डॉ. विशाल ओव्हाळ, प्रा. डॉ. ऊर्मिला दशवंत, प्रा. परशुराम वडर, प्रा. डॉ. सागर वाळवेकर, प्रा. मृणालिनी जगताप उपस्थित होते.




**कोल्हापूर : परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना निवृत्त अधिकारी चंद्रकांत दळवी.**

0 7 AUG 2022


तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## फ्रेंडशिप डे

**मैत्री दिन म्हटलं की आपल्या समोर येतो जिवलग मित्र किंवा मैत्रीणीचा चेहरा. मात्र आजच्या काळात मूक पशु, पक्ष्यांबद्दलची भूतदया जपत त्यांच्याविषयी 'मित्रप्रेम' जपणारे 'प्राणीमित्र' विरळच. अशाच काही अवलियांच्या विशेष मैत्रीवर टाकलेला हा प्रकाशझोत...**

# पक्ष्यांना हक्काचं घर अन् ओळख देणारा पक्षीमित्र!



- डॉ. ए. डी. जाधव यांनी उभारला घराच्या बागेत नैसर्गिक अधिवास
- शिवाजी विद्यापीठ परिसरातील विविध पक्ष्यांच्या ५० प्रजातींचा अभ्यास

**कोल्हापूर : डॉ. ए. डी. जाधव यांनी राहत्या घरी पक्षांना नैसर्गिक अधिवास दिल्याने त्यांच्या घराच्या पटांगणात जमा झालेले पक्षी.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या परिसराला निसर्गाचे वरदान लाभले आहे. या ठिकाणी असणाऱ्या नैसर्गिक अधिवासात असंख्य जातीच्या पक्ष्यांचे वास्तव्य आहे. या पक्ष्यांच्या जातींचे, वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना त्यांना थेट आपल्या घरातच घरटे बांधून देणारा प्राणीशास्त्राचा अभ्यासक, संशोधक पक्षीमित्र शिवाजी विद्यापीठाच्याच कॅम्पसमध्ये आहे. विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. ए. डी. जाधव हे या पक्षीमित्राचे नाव.

पक्षांना संरक्षणासाठी झाडी आणि खाण्यासाठी धान्यासह कीटक मिळाले की, त्यांचा आधिवास वाढतो. विद्यापीठात अनेक प्रकारचे पक्षी असून डॉ. जाधव यांनी आपल्या सदनिकांमध्येही राळे, ज्वारी, सूर्यफुल, कडधान्यांसह पाण्याची सोय केली आहे. त्यामुळे त्यांच्या घराच्या परिसरातही विविध जातींच्या पक्ष्यांचा आधिवास निर्माण झाला. यातील पक्ष्यांचे निरीक्षण, वैशिष्ट्ये आणि प्रजातीची ओळख यांचा अभ्यास ते करत आहेत. शिवाजी विद्यापीठात जास्तीत जास्त मोर, लांडोर, पाणकोंबडी, बटेर, निलकंठ, राजहंस, सुगरण, बुलबुल, साळुंकी, मैना, घुबड, पिंगळा आदी ५० प्रकारच्या पक्ष्यांच्या प्रजाती आहेत. त्यांचा अभ्यास करून डॉ. ए. डी. जाधव यांनी प्रत्येक पक्ष्याच्या छायाचित्रावर क्युआर कोडच्या माध्यमातून माहिती दिली आहे. स्मार्ट फोनच्या माध्यमातून क्युआर कोड स्कॅन केला की संबंधित पक्षांची शास्त्रीय माहिती उपलब्ध होते. विद्यापीठात या पक्षांचे फोटो लावले आहेत. तसेच पक्षांचे संवर्धन करण्यासाठी राज्य जैवविविधता मंडळातर्फे राज्यभरातील प्रत्येक वनअधिकाऱ्यांना त्यांच्या हद्दीत पक्ष्यांना पुरेसे खाद्य, पाण्याची व्यवस्था करावी. पक्ष्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी कुरण व कीटकरूपी खाद्य तयार करावे, भारव्दाज पक्षी बहुतेक पक्षांची अंडी आणि पिल्ले खातो, त्यामुळे त्यांचे जतन, संवर्धन आणि संरक्षण केले पाहिजे. अधिवासात मानवी हस्तक्षेप रोखणे, झाडांवर घरटी बांधणे, त्यामुळे प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीने पक्ष्यांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी. घराच्या, रहिवासी भागात कृत्रीम घरटी लावून पक्ष्यांचा आधिवास वाढवण्याचा प्रयत्न करावा, आदी पक्षीमित्र होण्यासाठीच्या सूचना डॉ. जाधव करतात. स्वतः कृती केल्यानंतर त्यांनी पक्षी वाचविण्यासाठी केलेले आवाहन पर्यावरणाचे संरक्षण करणार आहे.

### जाधव दाम्पत्य बनले पक्ष्यांचे मित्र

डॉ. जाधव यांनी विद्यापीठातील सदनिकेमध्ये पक्ष्यांसाठी पाण्याच्या तलावासह राळ, कडधान्य, बाजरी, ज्वारी, पेरू, नाचणीची लागवड केलीय. पक्षी आपल्या गरजेनुसार येतात पाणी पितात, धान्य खातात आणि निघुन जातात. या सदनिका परिसरात काही पक्षांनी घरटीदेखील तयार केली आहेत. त्यातील पिल्ले पावसाळ्यात भिजू नये म्हणून घरट्यांना प्लास्टिकचे आवरण घातले आहे. पक्षांना इजा झाल्यास त्यांच्यावर उपचार केले जातात. डॉ. जाधव यांच्या या पक्षीमैत्रीत त्यांच्या पत्नी प्रियंका जाधल यांची मोलाची साथ लाभते.

### पक्षी मानवाचे मित्र असतात



घुबड, पिंगळा हे पक्षी घराच्या बाजूला आवाज काढत असेल तर त्यांना उसकवून लावू नये. कारण ते साप, उंदीर दिसल्यावर ओरडतात आणि त्यांना खाण्याचे काम. करतात. मानवाच्या कल्याणात पक्ष्यांचाही मोठा सहभाग आहे. पक्षी मानवाचे मित्र असतात, त्यामुळे मुलांना बालपणापासूनच निसर्गातील प्राणी, पक्षांची ओळख करून दिली पाहिजे.

**- डॉ. ए. डी. जाधव**
**प्राणीशास्त्र, शिवाजी विद्यापीठ**

जनसंपर्क कक्ष
0 7 AUG 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाकडून स्टार्टअपना चालना

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरच्या 'एसयूके रिसर्च अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' या सेक्शन- ८ कंपनीमार्फत 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमाची निर्मिती केली आहे. ऑगस्ट महिन्याचे चॅलेंज हे 'इंटरनेट ऑफ थिंग्स' या संकल्पनेवर आहे. त्याद्वारे स्टार्टअपना चालना मिळणार आहे.

विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे सुचविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक विषय देऊन त्यावर विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी त्या संदर्भातील त्यांनी शोधलेले प्रश्न त्यावर शोधलेले कल्पक पर्याय अथवा उत्तर विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईट darb News and Event - Monthly Innovation Challenge या लिंकवरील गुगल फॉर्ममध्ये भरावयाचे आहेत.

पुढारी

# विद्यापीठातर्फे आज पर्यावरण अभ्यास विषयाचा पेपर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ मधील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध परीक्षा केंद्रांवर सुरू आहेत. सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या सत्रकरिता पर्यावरण अभ्यास आवश्यक विषयाचा पेपर रविवार (दि. ७) रोजी दुपारी १ ते २ वेळेत होणार आहे. दरम्यान, बी.एस्सी., एम.एस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स, फूड प्रोसेसिंग अँड पॅकेजिंग, फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, फॉरेन्सिक सायन्स, शुगर टेक्नॉलॉजी, बायो-टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र, ॲनिमेशन, आयटी, हॉर्टिकल्चर), बी. व्होक (फौंड्री टेक्नॉलॉजी, ॲटोमोबाईल, प्रिंटिंग अँड पब्लिशिंग, फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट) अभ्यासक्रमांचा पर्यावरण अभ्यास आवश्यक विषयाचा पेपर दिवशी दुपारी ४ ते ५ या वेळेत होणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठ परीक्षांना ३१ हजारांवर विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रातंर्गत विद्यापीठस्तरावरील परीक्षेतंर्गत शनिवारी ३६ विषयांच्या परीक्षा झाल्या. ३१ हजार ३२ विद्यार्थी परीक्षेला बसले. महाविद्यालय, विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षांना प्रारंभ झाला आहे. सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्याची माहिती परीक्षा विभागातर्फे देण्यात आली.